# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६७०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/१०/२०१६

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ११/१०/२०१६ रोजी १९.५० ते २०.३० वा. दर. यातील फिर्यादी अविनाश अरुण कुकडे वय २८ वर्ष, रा. बेला याने आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ एन ११३५ कि. २५,०००/–रु. ची दसरा मैदानाच्या शेजारी ऊभी करुन रावन दहनाचा कार्यक्रम पाहण्यास गेला असतांना कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण नाशिक नगर दसरा मैदान येथुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साकोरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) वाहनाचे खोटे दस्ताऐवज तयार करुन चारचाकी गाडीची विक्री करतांना विश्वासघात केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २४/१०/२०१३ ते ०७/१०/२०१६ चे. दर. यातील आरोपी हा फिर्यादीचा भाचा असुन तो बेरोजगार असल्याने फिर्यादीने त्याला स्वतःचे मालकीची बोलेरो चार चाकी वाहन क्र. एमएच ३१ जेके ८५१५ भाडयाने चालविण्या करीता दिली असता आरोपीने फिर्यादीला कोणत्याही प्रकारची माहीती न देता वाहनाचे खोटे दस्ताऐवज तयार करुन परस्पर विक्री करुन फिर्यादीचा विश्वासघात करुन फसवणुक केल्याने फिर्यादी संतोष नागोराव फुटाने वय ४२ वर्ष, रा. वांगी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे. सिहोरा येथे कलम ४२०,४०६,४६८,४७१ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मुंडले पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) वडीलांनी मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोद . :–**

दिंनाक. १०/१०/२०१६ रोजी १३.३० वा. दर. यातील आरोपीने स्वतःच्या मुलीला जेवन वाढ म्हणुन असा बहाना करुन ती जेवन वाढुन पलंगावर जावुन झोपली असता घरी कुणी नाही हे पाहुण तिचे तोंड दाबुन तिच्यावर अत्याचार केला आणि तु कोणाला सांगीतले तर जिवाने ठार मारीन अशी धमकी दिल्याने फिर्यादी व डॉ. रिपोर्ट वरून पो.स्टे अडयाळ येथे कलम ३७६(१)(२)फ,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शेख पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक १२/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, गोबरवाही, लाखनी, पवनी व लाखांदुर येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ०५ लिटर हातभटटी दारु कि. २५० तसेच ३ लिटर ७८० मिली देशी दारु कि. १,०५०/–रु. असा एकुण १,३००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता